**प्रकरण 2**

**(पुस्तिका 1)**

# संस्थेचा तपशील, कार्य व कर्तव्ये

## उप जल अभियंता (पश्चिम उपनगरे)

1.1 **रचना, कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील**

पश्चिम उपनगरातील ग्राहकांना पिण्याचे पाणी पुरवणे.

1.2 **या कार्यालयाचे ध्येयः-**

पश्चिम उपनगरातील ग्राहकांना, पिण्यायोग्य व पुरेसे पाणी सम प्रमाणात पुरविणे.

1.3 **या प्राधिकरणाबद्दल सविस्तर माहिती व निर्मिती**

सन 1836 मध्ये बी डब्लु डब्लु (बॉम्बे वॉटर वर्कस्)ची स्थापना झाली आणि तेंव्हापासून या विभागाकडे पाणीपुरवठा व्यावस्थेच्या वितरण,संचालन व परिरक्षणाची जबाबदारी आहे .

महानगरपालिका कायदा 1888 अन्वये महापालिकेचे अनिवार्य कर्तव्य खालील प्रमाणे आहे:-

“सार्वजनिक व खाजगी मालमत्तेस जलवितरण प्रणाली मार्फत पाणीपुरवठा करण्यासाठी बांधकामे करणे व केलेल्या कामांचे परिरक्षण करणे”

जलअभियंता खाते हे मुलतः वर उल्लेखलेल्या बाबींसाठी जबाबदार आहे. वितरण प्रणाली सुलभरीत्या व्हावी त्याकरीता प्रशासनाने मुंबई शहर हे शहर विभाग, पूर्व उपनगरे व पश्चिम उपनगरे या तीन विभागांमध्ये विभागलेले आहे. या अनुषंगाने वर उल्लेखीत विभागांकरीता उप जल अभियंता नेमलेले असून ते उप जल अभियंता (शहर), उप जल अभियंता (पूर्व उपनगरे) व उप जल अभियंता (पश्चिम उपनगरे) असे आहेत.

1.4 **या प्राधिकरणाची कार्ये -**

पश्चिम उपनगरातील पाणीपुरवठा यंत्रणा व अनुषंगीक कामांवर देखरेख करणे.

1.5 **या प्राधिकरणाची मुख्य कार्यपध्दती व कार्ये -**

वरीलप्रमाणे.

1.6 **या प्राधिकरणाने नागरिकांना पुरवण्यात येणाऱ्या सुविधा व त्यासंबंधीची सविस्तर माहिती.**

पश्चिम उपनगरात पाणी पुरवठा करणे. पश्चिम उपनगरात उपलब्ध झालेले पाणी विविध पाणी वितरण विभागांतील ग्राहकांना पुरविणे.

1.7 **महानगरपालिकेतील संस्थेच्या कार्यसूचीचा तक्ता सोबत जोडला आहे.**


उप जल अभियंता (पश्चिम उपनगरे)
का.अभि.ज.का.(प.उ.)द
का.अभि.ज.का.(प.उ.) उ
सहा.अभि. ज.का.(ग. नि.)प.उ.
प्रशासकीय अधिकारी
स.अभि. (ज,का.) एच/पू
स.अभि. (ज,का.) एच/प
स.अभि. (ज,का.) के/पू
स.अभि. (ज,का.) के./प
स.अभि. (ज,का. ) पी/द.
स.अभि. (ज,का.) पी/उ-प
स. अभि. (ज. का.) पी/उ-पू
स.अभि. (ज,का.) आर /द/
स.अभि. (ज,का.) आर /मध्य
स.अभि. (ज,का.) आर /उ
मु.लि. .
वरिष्ठ लघु लेखिक
लिपिक
नाईक
शिपाई

Figure 1

1.8 **<u>या प्राधिकरणाच्या वाढीव सुलभ व सुटसुटीत कामगिरीसाठी नागरिकांकडून अपेक्षा</u>**

i. **पाण्याचा विवेकपूर्वक वापर करणे.**

ii. **जलवितरण संस्थेचे नुकसान न करणे.**

iii. **जलदेयकांचा तसेच जलकरांशी संबंधीत करांचा भरणा वेळेवर करणे.**

iv. **जलवितरण करण्यासाठी महापालिकेस सहकार्य करणे.**

v. **पाण्याच्या अवैध वापराबाबतची माहिती महापालिकेस देणे.**

1.9 **<u>नागरिकांचे सहकार्य व सहभागासाठी योजना व पध्दती -</u>**

**जनजागृती करीता जलमेळाव्याचे आयोजन केले जाते.**

1.10 **<u>नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी विविध यंत्रणा –</u>**

i. **विलेपार्ले (पूर्व) येथे नियंत्रण कक्ष.**

ii. **नागरीक आपली तक्रार 1916 ह्या दूरध्वनी क्रमांकावर (विना आकार) नोंदवू शकतात.**

iii. **संबंधीत विभाग कार्यालयाशी संपर्क साधू शकतात.**